PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# संत तुकाराम आणि कीर्तन आचारसंहिता

**प्रा. डॉ. रमेश तु. देशमुख**
मराठी विभाग प्रमुख
सिध्दार्थ महाविद्यालय जाफ्राबाद
ता. जाफ्राबाद जि. जालना.
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावणा :

कीर्तन नवविधा भक्ती पैकी दुसरा भक्तिप्रकार मानला जातो. भगवंताच्या मंगलमय लीला ज्यात वर्णिल्या आहेत, अशा कथा सांगणे, भगवच्चरित्र पठण करणे व भगवंताचे नाम संकीर्तन करणे या गोष्टींचा अंतरभाव कीर्तन भक्तीत होतो. कीर्तनाचे स्थूल मनाने वारकरी कीर्तन, नारदीय कीर्तन असे प्रकार पडतात. वारकरी कीर्तन हे निरुपणात्मक असते. यात कीर्तनकार वारकरी संतांचा एखाद्या अभंग निरुपणासाठी घेतो आणि संतवाङ्मयातील विविध वचने उद्‌घृत करुन आणि पौराणिक कथांचे व संतचरित्राचे दाखले देऊन त्या अभंगाचे विवरण करतो, प्रतिपादनासमयी कोणाही संताचा उल्लेख आला, म्हणजे साथीसाठी उभे असलेले टाळांच्या गजरात ते संतवचन गाऊन कीर्तनकारास साथ करतात. अधूनमधून भजन व नामघोष, पण मुख्यतः निरुपण असे वारकरी कीर्तन असते. कीर्तनाचे भजन, पुराण, वारकरी कीर्तन आणि नारदीय कीर्तन हे चार संप्रदाय आजही रुढ आहेत.

## तुकाराम कालीन महाराष्ट्र :

संत ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर थोड्याच काळात महाराष्ट्र पारतंत्र्यात गेला. तेराव्या शतकापासून सततची राजकीय अस्थिरता महाराष्ट्राच्या वाट्याला आली. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरणावर झाला. धार्मिक असहिष्णुता आणि राजकीय कुटनीती यांनी गच्च भरलेला या तीनशे वर्षाच्या कालखंडाचे वर्णन महाराष्ट्रातील तमायुग म्हणून केले जाते. यातच


SECOND INTERNATIONAL CONFERENCE ( ICDBVIHCIM 2018 ) 6-7 OCTOBER 2018
SPECIAL ISSUE –OCT 2018 www.puneresearch.com/times (MS) INDIA
(IMPACT FACTOR 3.18) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL JOURNAL

तुकारामाच्या कालखंडात भारतात वरील उलथापालथ चालू होती. दक्षीण भारतात मोठ्या प्रमाणात ही उलथा पालथ चालू होती. मराठ्यांनी आपले अस्तीत्व दाखवण्याचे काम मराठ्यांनी याच काळात केले. विजयनगरचे दक्षिणेतील हिंदूचे एकमेव राज्य इ.स.1565 मध्ये बहामनी सुलतानामुळे नाश पावले. उत्तरेतील मोगलांचे आक्रमण थांबवण्यासाठी बहामनी कुळांची धडपड चालू होती. निजामशाही, अदिलशाही, इमादशाही, बदीरशाही, कुतूबशाही एकाच वेळी आपआपसात लढत होत्या. दुसऱ्या बाजूने मोगलाशीही लढा चालू होता. मोगल आणि निजाम यांच्यातील नेहमी चालू असलेल्या संघर्षामुळे संततुकारामांच्या गावच्या पंचक्रोशातील आसपासचा परिसर उजाड झाला होता. इमादशाही आणि बदीरशाही मोगलानी गीळकृत केली. यांना रोखण्याचा प्रयत्न अदिलशाही व कुतूबशाहीने केला. शहाजहानच्या काळात निजामशाहिचा ऱ्हास झाला. हे राज मोगल व अदिलशाहीत विभागले गेले. यांच्यातील या आपआपसातील लढायासाठी या सूलतानांना स्थानिक मराठ्यांची गरज पडत असे. त्यामुळे कोणत्यातरी परक्या सुलतानासाठी मराठे आपआपसात लढून मरत होते. मराठ्यांची शरीराबरोबर मनेही मेली होती. त्यामुळे मराठी मनावर चाली–रीती, संस्कृती, भाषा, रुढी व परंपरा यांचा परिणाम झाला होता. सुन्नी आणि शिया सुलतानातील लढा हा दोन धार्मिक संप्रदायातील होता. सातत्याने चाललेल्या संघर्षामुळे महाराष्ट्र प्रदेशातील अर्थव्यवस्था, कोलमडून गेली होती. धर्मांध शक्तीमुळे हिंदू जनतेत सामाजिक शिथीलता आली होती. समाजात मोठ्या प्रमाणात अव्यवस्था निर्माण झाली होती. संत एकनाथाचा अपवाद सोडला, तर या तीनशे वर्षात एकही महत्वपूर्ण लेखक निर्माण झाला नाही. संस्कृतीचा ऱ्हास होत होता. असाही विस्कटलेला महाराष्ट्रीय समाजात बुवाबाजी, अनाचार व तंत्रविद्येला बळी पडत होता. या रंजल्या मांजलेल्या समाजाला अंगारे–धुपारे, जादूटोणा, कर्मकांड, नवस, चमत्कार यांच्या बुजबुजाटाने सर्वांगांनी लूबाडल्या जात होता.

संत तुकारामाच्या काळात सर्वार्थाने समाजाची दैन्यावस्था झाली होती. क्षत्रिय–ब्राम्हण आपआपले कर्तव्य विसरले होते. एकुणच अनाचार सुरु होता. समाजाला नेतृत्वच राहिले नाही. अशी अवस्था होती. सर्वसामान्य माणसे सात्विक दैवतांना सोडून क्षुद्र दैवतांना भजत होती. एकुणच समाजाची फसवणूक चालू होती. अशा समाजाला सौम्य शब्दात सांगून फरक पडत नव्हता. त्यामुळे संत तुकाराम या दिन समाजाचे आई–वडिल झाले आणि दृष्ट प्रवृत्तींचे उन्मूलन करण्याचे कार्य केले.

### संत तुकारामांची कीर्तन आचारसंहिता :

PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

संत तुकारामांच्या काळात सतराव्या शतकात कीर्तनाचा व्यावसाय करणारे व आख्यान रंगविणारे धंदेवाईक निर्माण झाले होते. आध्यात्माचाही बाजार वाढला होता. व्यावसायिक कीर्तनकारांना या भक्तिमार्गांशी काहीही देणेघेणे नव्हते. लोकांना धार्मिक आख्याने आवडतात. म्हणून लोकांना कथागोष्टी रंगवून सांगण्याकडे कीर्तनकारांचा कल वाढला. मागणी तसा पुरवठा करण्याचे व्यावसायिक तत्व कीर्तनात शिरले.

संत तुकारामांना कीर्तनाचा धंदा करणाऱ्यांचा कमालीचा संताप येत. कीर्तनकार धर्मबुडवे आहेत, असे संत तुकोबांना वाटत असे. संत तुकारामांनी या व्यावसायिक कीर्तनकऱ्यांचा नेहमीच विरोध आणि निषेध केला आहे. त्यानिमित्ताने संत तुकारामांनी कीर्तनाची आचारसंहिताच प्रतिपादित केली आणि ती आपल्या कृती उक्तीतून राबविली. समाजासमोर आदर्श कीर्तनाचा कित्ता ठेवला. कीर्तन कसे करावे, कसे करु नये? या प्रश्नांची उत्तरे संत तुकारामांनी आपल्या अभंगातून दिली आहेत.

कीर्तनाच्या माध्यमातून समाजात चांगला नागरिक होण्यासाठीच्या क्षमता बिंबता येतात.

*"कीर्तनाची गोडी। देव निवडी आपण।।*

*कोणी व्हारे अधिकारी। त्यासी हरि देईल।।*

*वैराग्याची बळे। साही खळ जिणावे।।*

*उरेलना उरी। तुका करी बोभाट।। "*

कीर्तनात देवाला गोडी आहे. कीर्तनाचे माधुर्यही देवाला आवडते. कीर्तन करण्यासाठी आणि एकण्याठीही अधिकारी व्हावे लागते.

कीर्तन करण्याची एक स्वतंत्र संहिता संत तुकारामांनी अंगी लावली होती.

*"जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे।।*

*बुका लावू नये भाळा। माळ घालू नये गळा।।*

*तुका म्हणे द्रव्य घेती। देती तेही नरका जाती।।"*

या वरुन संत तुकारामांनी बाजारुवृत्तीचा निषेध केला होता. हे लक्षात येते संत तुकाराम आपणच घालून दिलेल्या आचार संहितेचे पहित्यांदा पालन करीत स्वतःबद्दल खात्री देण्यासाठी

*द्रव्य घेऊनिया कथा जरी करी। तरी भंगोहरी देह माझा।।* – असे म्हणत.

कीर्तनाचे पोटार्थी साधन मानना-या तत्कालीन कीर्तनक-यांना संत तुकारामांच्या वाणीतील विखार कधीच सहण होण्यासारखा नव्हता.

*"भिक्षापत्र अवलंबणे। जळो जिणे लाजिरवाणे। एसियासी नारायणे। उपेक्षीजे सर्वथा।।*

*देवा पायी नाही भाव। भक्ती वरी वरी वाव। समर्पिला जीव। नाही तो हा व्याभिचार।।*

*जगा घालावे साकडे दीन होऊनि बापुडे। हे चि अभाग्य रोकडे। मूळ आणि विश्वास।।*

*काय न करी विश्वंभर। सत्य करिता निर्धार। तुका म्हणे सार। दृढ पाय धरावे।।"*

धर्माच्या नावावर भिक्षा मागणा-यांचे जीवनच लाजिरवाणे आहे. अशा जीवनाला आग लागो असल्या स्वार्थी आणि पोटार्थी लोकांची, देव नेहमीच उपेक्षा करतो कारण त्यांची भक्ती, त्यांचे निरुपण कोरडे असते. भक्तिभाव हा कोरडा वरवरचा असतो. हे लोक सोंगी आणि ढोंगी असतात.

कीर्तनाचा धंदा करणारे, विक्रा करणारे चांडाळ, हे मातेशी व्याभिचार करणारे आणि भाड खाणारे लोक आहेत. हरिगुण कीर्तीच्याही गुणांचा प्रचार करतांना हे पोटार्थी असतात. अशा धंदेवाईक कीर्तनक-यांचे तोंडही पाहू नये कारण हा आपला जन्म आपल्या पूर्वजांना नरकी धाडण्यातच खर्च करीत असतो.

*"कीर्तनाचा विकरा मातेचे गमन। भाड खाई धन विटाळ तो।।*

*हरिभक्ताची माता हे हरिगुण कीर्ती। इजवर पोट भरिती चांडाळ ते।।*

*अत्यंज हा ऐसे कल्पांती करीना। भाड हे खाईना जननीची।।*

*तुका म्हणे त्याचे दर्शन ही खोटे। पूर्वजासि नेटे नरका धाडी।।"*

संत तुकारामाच्या वाणीचा विखार हा असा जाज्वल्य आहे.

कीर्तनाचा बाजार करणे आणि कीर्तनाचा धंदा करणे संत तुकोबांना मान्य नव्हते. असे कीर्तन पोटासाठी असते अशा कीर्तनात पांडुरंगाचाही सहवास नसतो. कीर्तन एकणा-यांकडून काही धनप्राप्ती व्हावी म्हणूनच कीर्तनकरी लोकांना अशाने आख्यान सांगतो आणि आपले लक्ष लोकांकडून धन वसूल करण्यावरच केंद्रित करतो.

*"उभ्या बाजारात कथा। हे तो नावडे पंढरीनाथा।।*

*अवघे पोटासाठी ढोंग। तेथे कैसा पांडुरंग।। लावी अनुसंधान।।*

*काही देईल म्हणऊव।। काय केले रांडलेका। तुला राजी नाही तुका।।"*

अशा कीर्तनकऱ्यांना त्यांच्या पापकर्माची कठोर जाणीव करुन देतांना संत तुकाराम त्यांना रांड लेका असे म्हणतात. यावरुन संत तुकारामांनी स्वतःच्या करणी आणि कथनीतून आचारसंहिता साकारली आहे.

**सारांश :**

संत तुकारामाच्या काळात सतराव्या शतकात कीर्तनाचा व्यवसाय करणारे आणि आख्यान रंगविणारे धंदेवाईक कीर्तनकारांनी आध्यात्माचा बाजार वाढवला होता. अशा कीर्तनकारांचा संत तुकारामांना संताप येत असे. ते धर्म बडवत आहे असे त्यांना वाटत. त्यामुळे व्यवसायिक कीर्तनकऱ्यांचा ते संतप्तवाणीने निषेध करतात. त्यामुळेच संत तुकारामांनी कीर्तनाची आचारसंहिताच प्रतिपादन केली. कीर्तनाचे साधन पोटार्थी झाल्यामुळे संत तुकाराम अतिशय दुःखी झाले होते. त्यामुळेच धर्माच्या आणि भक्तीच्या क्षेत्रात पाखंड खंडणासाठी जहाल शब्दाचा वापर करण्याची गरज त्यांना वाटली. संत तुकारामाच्या वाणीतील विखार हा समाजाच्या व सामान्य जनांच्या प्रबोधनासाठीच होता. संत तुकाराम जे बोलत त्याची सुरवात ते स्वतः पासून करत असे त्यांनी स्वतःच्या अनुभवातूनच कीर्तनकारांचा आदर्श घालून दिला, व कीर्तनासारख्या पवित्र अशा क्षेत्रात वाढलेला भ्रष्टाचार खणून काढण्याचा प्रयत्न अखंड केला आहे. तसेच ढोंगी आणि पाखंडी कीर्तनकारांपासून सावध राहण्याचा इशाराही दिला.

## संदर्भ :


1. भारतीय संस्कृतीकोश.
2. मराठी वाङ्मय कोश – खंड चौथा – समीक्षा संज्ञा – समन्वयक संपादक – विजया राजाध्यक्ष.
3. समग्र तुकाराम दर्शन – डॉ. किशोर सानप.
4. एका लेखकाचा विशेष अभ्यास : संत तुकाराम – दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
5. तुकारामाची गाथा – शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय.